भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०६/२०१७

**१) संगनमत करुन शिवीगाळ व काठीने मारुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १६/०६/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी देवेन्द्र जनार्धन बनकर वय ३० वर्ष, रा. कोरंभी हा आपले शेतात काटया तोडत असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करुन तुझे कशाचे पैसे असे बोलुन फिर्यादीस शिवीगाळ करुन तोंडावर बुक्कीने मारुन समोरील दात पाडले व कपाडावर काठी मारली व थापडबुक्यांनी पाठीवर, पोटावर मारुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टर परीक्षण रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२५,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) गालावर थापड व नखे ओरपडल्यामुळे गालावर चिरा मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०६/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा जि. प. प्राथमीक शाळा दिघोरी येथे बसलेला असतांना यातील आरोपीने फिर्यादीस पाहुण भजे टाकावे असे बोलल्या वरुन फिर्यादीने आरोपीस तु मला भजे टाकावे का बोललास असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीचे डावे गालावर थापड मारुन त्याचे बोटा मधील अंगठी किंवा नखे ओरपडल्यामुळे गालावर चिरा मारल्या सारखी जखम झाल्याने फिर्यादी अर्जुण मारोती गोंडाने वय ५५ वर्ष, रा. दिघोरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे दिघोरी येथे कलम ३२४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) प्राण्याची कत्तल करुन मास विक्री करतांना साहित्यासह मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०६/२०१७ चे ११.४५ वा. दरम्यान यातील गुप्त माही व्दारे मिळालेल्या खबरे वरुन यातील आरोपीचे घराची प्राण्याची कत्तल करुन मास विक्री बाबत झडती घेतली असता त्याचे घर झडतीत २ चुंगळी मध्ये २० किलो प्राण्याचे डोके, पाय, कातडे मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. कुंभरे पो. स्टे. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ४२९ भांदवी. सहकलम ५५(ब),५(क) महा. प्राणी संरक्षण अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) एटीएम मध्ये पैसे टाकण्यास सांगुन पैश्याची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०६/२०१७ ते १६/०६/२०१७ पर्यत यातील फोन धारक आरोपी याने फिर्यादीस फोन करुन तुम्हास कामावर लेबर पाहीजे आहेत आम्ही १२ लेबर कामावर येतो परंतु आम्हास रेल्वेत टि. सी. ने पकडले असुन फाईन भरण्यास ७५००/—रु. माझे अकाऊंटवर टाका असे बोलला असता फिर्यादीने पैसे अकाऊंट मध्ये टाकताच ते विड्रॉल करुन व पैसे एटीएम मधुन निघत नाही पुन्हा पैसे टाका असे म्हणुन फसवणुक केल्याने फिर्यादी गुणवंत रामदास पुडके वय ४२ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड बेला तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ४२० भांदवी. सहकलम ६६(क) आय.टी.ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. कंकाडे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अंधरात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या ईरादयाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०६/२०१७ चे २१.१५ ते २१.४५ वा. दरम्यान यातील आरोपी हा बिटीबी सब्जी मंडी भंडाराचे गेट जवळ अंधारात आपले अस्तित्व लपवुन लपत छपत दखलपात्र गुन्हा करण्याच्या ईरादयाने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भोगे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) शेतावर धुरे जाळत असतांना कपडयाला आग लागुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १६/०६/२०१७ चे ०९.०० ते १६.३० वा. दर. यातील मृतक ताराचंद भदरु शेन्द्रे वय ६७ वर्ष, रा. जांभोरा हा स्वतःचे शेतावर धुरे जाळण्यास गेला असता धुरे जाळतांनी मृतकचे अंगावरील कपडयाला आग लागुन जळुन मरण पावल्याने फिर्यादी मुलचंद ताराचंद शेन्द्रे वय ४४ वर्ष, रा. जांभोरा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**७) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक १६/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, तुमसर, आंधळगाव, साकोली, लाखनी व अडयाळ येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २०४ लिटर हातभट्टी दारु +सडवा + साहीत्य किंमती २८८२०/—रु, ११२ लिटर ५०० मिली लिटर देशी/विदेशी दारू+ २मोटार सायकल किंमती १,४१,३१६/—रु. असा एकुण किंमती १,७०,१३६/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.